# पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,
## पिंपरी ४११०१८.

जाहिरात क्रमांक -२३९/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील गट 'अ' ते 'ड' मधील खाली नमूद केलेल्या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी, प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून Online पध्दतीने www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्जामध्ये चुकीची माहिती सादर करणाऱ्या उमेदवारांना सदर परीक्षेसाठी व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविणेत येईल. पदसंख्या, वेतनश्रेणी व आरक्षण खालीलप्रमाणे :-

**गट 'अ' मधील पदे :--**

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (पे बँड व ग्रेड पे र.रु.) | पदसंख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १. | अस्थिरोग तज्ञ | १५६००-३९१००ग्रेड पे ६६०० | ०२ | अ.जाती -१<br>खुला -१ |
| २. | भूलतज्ञ | १५६००-३९१००ग्रेड पे ६६०० | ०१ | अ.जमाती -१ |
| ३. | सर्जन | १५६००-३९१००ग्रेड पे ६६०० | ०२ | अ.जाती १<br>खुला १ |
| ४. | फिजिशियन | १५६००-३९१००ग्रेड पे ६६०० | ०३ | अ.जमाती १<br>खुला २ |
| ५. | कान-नाक-घसा तज्ञ | १५६००-३९१००ग्रेड पे ६६०० | ०२ | अ.जाती १<br>खुला १ |
| ६. | क्ष किरण शास्त्रज्ञ | १५६००-३९१००ग्रेड पे ६६०० | ०१ | खुला १ |

**गट 'ब' मधील पदे :--**

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (पे बँड व ग्रेड पे र.रु.) | पदसंख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | १४ | अ.जाती २<br>अनु. जमाती २<br>भ.ज.क. १<br>वि.मा.प्र. १<br>इ.मा.व. १<br>खुला ७ - पैकी २ महिला |

वैद्यकीय अधिकारी एकूण १४ रिक्त पदांमध्ये २ पदे अपंग(अस्थिव्यंग)(One leg ) प्रवर्गासाठी आरक्षित आहेत. सदर पदे सामान्य प्रशासन विभाग न्याय-२००७/स.न्या./प्र.क्र.१०३(भाग ३) /१६-अ, दि.१९/१०/२००७ मधील तरतुदीप्रमाणे भरण्यात येतील.

**गट 'क' मधील पदे :--**

| अ क्र | पदनाम आणि वेतनश्रेणी (पे बँड व ग्रेड पे र.रु.) | पद संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु. जाती | अनु. जमाती | वि. जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ ज (ड) | वि मा प्र | इ मा व | खुला |
| १ | आरोग्य निरीक्षक ९३००-३४८०० ग्रेड पे रु.४२०० | १३ | सर्व साधारण आरक्षण | ०१ | ०१ | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०२ | ०३ |
| | | | माजी सैनिक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ |
| | | | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ |
| | | | अंशकालीन कर्मचारी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ |
| | | | एकूण | ०१ | ०१ | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०२ | ०७ |
| | | | शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग न्याय-२००७/स.न्या/प्र.क्र.१०३(भाग ३)/१६-अ, दि.१९/१०/२००७ नुसार, उपरोक्त १३ रिक्त पदांमध्ये अल्पदृष्टी(Low vision) प्रकारासाठी १ पद व अस्थिव्यंग (One leg किंवा One Arm) प्रकारासाठी १ पद आरक्षीत. | | | | | | | | | |
| २ | पब्लिक हेल्थ नर्स ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | ०४ | सर्व साधारण आरक्षण | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०३ |

| अ क्र | पदनाम आणि वेतनश्रेणी (पे बँड व ग्रेड पे र.रु.) | पद संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु. जाती | अनु. जमाती | वि. जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ ज (ड) | वि मा प्र | इ मा व | खुला |
| ३ | स्टाफनर्स<br>९३००-३४८००<br>ग्रेड पे रु.४३०० | २५ | सर्व साधारण आरक्षण | ०१ | ०२ | -- | -- | -- | ०१ | -- | ०२ | ०६ |
| | | | प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ |
| | | | माजी सैनिक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०३ |
| | | | महिला | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०५ |
| | | | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ |
| | | | अंशकालीन कर्मचारी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ |
| | | | एकूण | ०१ | ०३ | -- | -- | -- | ०१ | -- | ०३ | १७ |
| | | | शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग न्याय-२००७/स.न्या/प्र.क्र. १०३ (भाग ३) / १६-अ, दि. १९/१०/२००७ नुसार, उपरोक्त २५ रिक्त पदांमध्ये अस्थिव्यंग (One leg) प्रकारासाठी ८ पदे आरक्षीत. | | | | | | | | | |
| ४ | कनिष्ठ अभियंता (विद्युत)<br>पदविकाधारक-<br>९३००-३४८००<br>ग्रेड पे रु.४४००<br>पदवीधर-<br>९३००-३४८००<br>ग्रेड पे ४६०० | ०४ | सर्व साधारण आरक्षण | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ |
| | | | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ |
| | | | एकूण | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०३ |
| ५ | वीजतंत्री<br>५२००-२०२००<br>ग्रेड पे रु.२८०० | ०७ | सर्व साधारण आरक्षण | ०२ | ०२ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०२ |
| ६ | वायरमन<br>५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | १० | सर्व साधारण आरक्षण | ०१ | ०२ | -- | ०२ | -- | -- | -- | ०३ | ०२ |
| ७ | सब ऑफीसर<br>९३००-३४८००<br>ग्रेड पे ४२०० | ०१ | सर्व साधारण आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | ०१ |

**गट 'ड' मधील पदे :–**

| अ क्र | पदनाम आणि वेतनश्रेणी (पे बँड व ग्रेड पे र.रु.) | पद संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु. जाती | अनु. जमाती | वि. जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ ज (ड) | वि मा प्र | इ मा व | खुला |
| १ | फायरमन<br>५२००-२०२००<br>ग्रेड पे १९०० | १५ | सर्व साधारण आरक्षण | -- | ०३ | ०१ | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०७ |
| | | | माजी सैनिक | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ |
| | | | एकूण | -- | ०४ | ०१ | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०८ |

२.१ वरील प्रवर्गनिहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये वदल होण्याची शक्यता असून त्याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ यांना राहतील.

२.२ समांतर आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.एस.आर.व्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६ अ, दि.१३/०८/२०१४ अन्वये आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

## ३. वयोमर्यादा :-

३.१ उपरोक्त गट 'अ' व 'ब' मधील पदांसाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय जाहिरातीच्या दिनांकास किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहील. 'वैद्यकीय अधिकारी' पदाकरीता कमाल वयोमर्यादा खुला प्रवर्गाकरीता ३३ वर्षे तर मागास प्रवर्गाकरीता ३८ वर्षे राहील. तर अस्थिरोग तज्ञ, भूलतज्ञ, सर्जन, फिजिशियन, कान-नाक-घसा तज्ञ, क्ष-किरण शास्त्रज्ञ या पदांसाठी अर्ज करणा-या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.

३.२ उपरोक्त गट 'क' व 'ड' मधील पदांसाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय जाहिरातीच्या दिनांकास किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहील. तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३८ वर्षे इतकी राहील. त्याचप्रमाणे गट 'क' मधील स्टाफनर्स या पदांकरिता सर्व जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष राहील.

३.३ प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त व नि:समर्थ व्यक्ती (अपंग) उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील.

३.४ माजी सैनिकांसाठी त्यांनी सैनिकी सेवेत व्यतित केलेला अखंड कालावधी हा त्यांच्या वयातून वजा करण्यात येईल. तसेच त्यांना कमाल वयोमर्यादेत ३ वर्षाची सवलत राहील.

३.५ स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य असल्यास वयाची कमाल मर्यादा ४५ व पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार असल्यास वयाची कमाल मर्यादा ४६ वर्षे राहील. खेळाडू यांच्यासाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

३.६ उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणाऱ्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासप्रवर्गातील उमेदवारांना वयोमर्यादेतील सवलती, शुल्कामधील सवलतीसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाही.

३.७ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना वयाची अट लागू राहणार नाही.

## ४. शैक्षणिक अर्हता :-

### ४.१ गट 'अ' मधील पदांकरीताची शैक्षणिक अर्हता

**१. अस्थिरोग तज्ञ-** (१)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील MBBS व अस्थिरोग विषयातील एम.एस ही पदवी किंवा पदविका असणे आवश्यक. (२)शासकीय/निमशासकीय/खाजगी रुग्णालयातील अस्थिरोग विषयातील ५ वर्षाचा अनुभव.(३)महाराष्ट्र मेडीकल कौन्सील कडील रजिस्ट्रेशन आवश्यक.

**२.भूलतज्ञ-**(१) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील MBBS आणि एम.डी. Aneaesthesia परीक्षा किंवा Aneaesthesia पदविका उत्तीर्ण. (२)०५ वर्षाचा अनुभव. (३)महाराष्ट्र मेडीकल कौन्सील कडील रजिस्ट्रेशन आवश्यक.

**३.सर्जन-** (१)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.डी (जनरल सर्जरी)/एम.एस. परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. (२)जनरल सर्जरी कामाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव. (३)महाराष्ट्र मेडीकल कौन्सील कडील रजिस्ट्रेशन आवश्यक.

**४.फिजिशियन-**(१)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील General Medicine विषयातील एम.डी. परीक्षा उत्तीर्ण.(२)०५ वर्षाचा अनुभव. (३)महाराष्ट्र मेडीकल कौन्सील कडील रजिस्ट्रेशन आवश्यक.

**५.कान-नाक-घसा तज्ञ-** (१)शासनमान्य संस्थेकडील E.N.T. विषयातील M.D. परीक्षा किंवा पदविका उत्तीर्ण. (२)०५ वर्षाचा अनुभव. (३)महाराष्ट्र मेडीकल कौन्सील कडील रजिस्ट्रेशन आवश्यक.

**६.क्ष-किरण शास्त्रज्ञ-** (१)मान्यताप्राप्त विद्यापीठा कडील Radiology विषयातील एम.डी परीक्षा किंवा DMRD उत्तीर्ण असणे आवश्यक. (२)किमान ०५ वर्षाचा अनुभव. (३)महाराष्ट्र मेडीकल कौन्सील कडील रजिस्ट्रेशन आवश्यक.

### ४.२ गट 'ब' मधील पदांकरीताची शैक्षणिक अर्हता

**१.वैद्यकीय अधिकारी-** (१)मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी परीक्षा उत्तीर्ण व इंटर्नशिप पूर्ण केलेली असणे आवश्यक. (२) राज्य मेडीकल कौन्सिल कडील रजिस्ट्रेशन आवश्यक.

### ४.३ गट 'क' मधील पदांकरीताची शैक्षणिक अर्हता

**१.आरोग्य निरीक्षक -** (१)एस.एस.सी उत्तीर्ण. (२)शासनमान्य संस्थेकडील आरोग्य निरीक्षक कोर्स उत्तीर्ण.

**२.पब्लिक हेल्थ नर्स -** (१)नर्स मिडवाईफ किंवा पब्लिक हेल्थ नर्सिंग मधील प्रमाणपत्र धारक किंवा भारतीय नर्सिंग कौन्सीलने मान्यता दिलेली बी.एस्सी नर्सिंग पदवी असणे आवश्यक. (२) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलकडील नोंदणी आवश्यक.

**३. स्टाफनर्स -** (१)बी.एस्सी नर्सींग अथवा बी.पी.एन.ए / जी.एन.एम शिक्षणक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक. (२)महाराष्ट्र नर्सिंग कौन्सील कडील नोंदणी आवश्यक.

**४.कनिष्ठ अभियंता(विद्युत) -** (१)मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी(बी.ई.) अथवा पदविका(डी.ई.ई.)

**५. वीजतंत्री -** (१)एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण. (२) शासनमान्य संस्थेकडील वीजतंत्री कोर्स उत्तीर्ण. (३)वायरमन कामाचा ०५ वर्ष अनुभव. (४)एन.सी.टी.व्ही.टी. प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य

**६.वायरमन -** (१)एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण. (२)महाराष्ट्र शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील वायरमन कोर्स उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक.

**७.सब ऑफीसर-** (१)राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपूर यांचेकडील सब-ऑफीसर परीक्षा उत्तीर्ण. (२)अग्निशमन कामाचा ३ वर्षाचा अनुभव

### ४.४ गट 'ड' मधील पदांकरीताची शैक्षणिक अर्हता

**१.फायरमन :-** (१)एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण. (२)राज्यशासनाच्या राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा.

## ५. परीक्षा शुल्क :-

५.१ अमागास उमेदवारांसाठी र.रु.३००/- आणि मागास उमेदवारांसाठी १५०/-, उमेदवारांनी वरीलप्रमाणे परीक्षा शुल्क मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांचे नांवे बँक ऑफ बडोदाच्या कोणत्याही शाखेत, संबंधित बँकेच्या कामकाजाच्या वेळेनुसार खाते क्र. ३१०६०२००००००८७ वर विहीत चलनाद्वारे भरणे आवश्यक आहे. चलनाची नमुना प्रत महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**६. अर्ज करणेची पध्दत :-**

६.१ Online अर्ज स्वीकारण्याचा कालावधी दि२८/०७/२०१५ रोजी सकाळी १०.००वा. पासून ते दि१७/०८/२०१५ रोजी सायं. ५.४५ वा.पर्यंत राहील. अर्ज फक्त www.pcmcindia.gov.in या महापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने स्वीकारणेत येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

६.२ सेवायोजन कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जिल्हा सैनिक मंडळाकडून, उमेदवारांच्या याद्या प्राप्त झाल्यास महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील, सदर उमेदवारांनीही www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर वरील मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याबाबतच्या व इतर सर्वसाधारण सूचना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्याचे उमेदवारांनी काळजीपूर्वक अवलोकन करुन अर्ज करावेत.

*सही/-*
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

क्रमांक प्रशा/१/कावि/६११/२०१५
दिनांक२८/०७/२०१५.

सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**

**पिंपरी १८**

**जाहिरात क्रमांक २३/२०१५ भरतीप्रक्रियेबाबत उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना**

**१. अर्ज, अर्हता, परीक्षा शुल्क इत्यादि :-**

१.१ ऑनलाईन पध्दतीशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज स्वीकारण्यासाठी विहीत केलेला दिनांक व वेळेनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

१.२ महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावा. त्याचवेळी त्यांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल, त्या पदाचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्वीकारण्यासाठी विहीत केलेला अंतिम दिनांक इत्यादि तपशील आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना कळवावा आणि आपला अर्ज विचारात घेतला जाण्यास कोणताही आक्षेप असल्यास, अर्ज स्वीकारण्याच्या अखेरच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत तसे मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांना परस्पर कळविणेची विनंती आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना करावी. अर्ज विचारात घेण्यास हरकत नसल्यास मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना तसे कळविण्याची आवश्यकता नाही, हेही त्यांना कळवावे.

१.३ अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी जाहिरातीचे दिनांकास, ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाच्या आवश्यकतेप्रमाणे शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर सर्व अर्हता धारण करणे/अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१.४ परीक्षा शुल्क बँक कामकाजाचे वेळेनुसार स्वीकारण्यात येईल.

१.५ उपरोक्त पदांसाठी विहित केलेले अर्ज <u>www.pcmcindia.gov.in</u> या संकेतस्थळावर दि. २८/०७/२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून ते दि.१७ /०८/२०१५ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत उपलब्ध होतील.

१.६ मागासवर्गातील उमेदवारांनी र.रु.१५०/- व अमागास/खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी र.रु.३००/- याप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. विहीत शुल्क न भरल्यास अर्ज अपात्र करणेत येईल.

१.७ परीक्षा शुल्क वर नमूद केल्याप्रमाणे फक्त बँक ऑफ बडोदा या बँकेचे कोणत्याही शाखेमध्ये चलनाव्दारे जमा करावे. इतर स्वरुपात प्राप्त होणारे परीक्षा शुल्क स्वीकारले जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१.८ कोणत्याही कारणास्तव सदर परीक्षा शुल्क परत केले जाणार नाही.

१.९ परीक्षा शुल्क भरल्याबाबतची बँक चलनाची प्रत कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१.१० माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क माफ राहील.

**२. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :-**

२.१ उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी <u>www.pcmcindia.gov.in</u> या संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच आपला अर्ज भरावा. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारले जातील .

२.२ अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देणेत आला आहे. उमेदवाराने त्याची संपूर्ण माहिती इंग्रजीमध्ये भरावी. अर्ज भरताना संपूर्ण माहिती CAPITAL LETTERS मध्ये भरावी. नावाच्या/पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

२.३ अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनाधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांना असतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

२.४ वय, शैक्षणिक अर्हता, मागासप्रवर्ग/क्रिमीलेअर प्रमाणपत्र, अपंग, महिला, माजी सैनिक, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादि संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

२.५ वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल.

२.६ एस.एस.सी/मॅट्रीक्युलेशन अथवा शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला या प्रमाणपत्रावरील जन्मदिनांकानुसार अर्जामध्ये जन्मदिनांक निवडावा. स्त्री/पुरुष संदर्भात संबंधित पर्याय निवडावा. तसेच अमागास, मागास, क्रिमीलेअर, अपंग, माजी सैनिक, खेळाडू इत्यादि संदर्भात लागू असलेली माहिती निवडावी.

२.७ शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

२.८ गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.

२.९ अर्ज भरावयास सुरुवात करण्याअगोदर शुल्क संगणकीय चलनाव्दारे भरणे आवश्यक आहे. बँक चलनाचा नमुना www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यातील आवश्यक माहिती भरुन प्रिंट काढून घ्यावी व शुल्क बँक ऑफ बडोदाचे कोणत्याही शाखेमध्ये जमा करावे. बँकेत शुल्क चलनाव्दारे जमा केल्यानंतर बँक चलनावर जो Branch code/Transaction ID नमूद करेल तो Branch code/Transaction ID ऑनलाईन अर्जावर भरल्याशिवाय अर्ज स्वीकृत केला जाणार नाही.

२.१० उमेदवारांनी शुल्क बँकेत चलनाव्दारे जमा केल्यानंतर www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरावा. अर्ज भरत असताना फोटो, स्वाक्षरी, बँक चलनाची प्रत स्कॅन upload करुन पुढे इतर आवश्यक माहिती अर्जामध्ये अचूक भरावी.

२.११ उमेदवारांनी सर्व माहिती भरल्यानंतर Preview वर Click करावे. यामुळे भरलेल्या अर्जाचे पुनर्विलोकन (Review) करता येईल. जर अर्जातील माहिती बदलावयाची असल्यास Next अथवा Preview बटन दाबून आपल्याला जी माहिती दुरुस्त करावयाची आहे, ती माहिती दुरुस्त करता येऊ शकेल.

२.१२ पुनर्विलोकन (Review) नंतर सर्व माहिती बरोबर असल्यास Submit बटनवर Click करावे. त्यानंतर आपला अर्ज Submit होऊन आपल्याला त्याची प्रिंट आऊट काढता येईल.

२.१३ पूर्णत: माहिती भरलेल्या अर्जाची प्रिंट आऊट काढून घ्यावी. प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी. कारण अर्जाची प्रिंट लेखी परीक्षेच्या वेळी तसेच कागदपत्रे तपासणीचे वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

२.१४ इंटरनेटवर उपलब्ध होणारा अर्ज क्रमांक जपून ठेवावा. कारण परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करताना आपणांस प्राप्त होणारा अर्ज क्रमांक व आपली जन्मतारीख अचूक नमूद केल्यानंतरच आपले प्रवेशपत्र आपणांस डाऊनलोड करता येईल.

२.१५ चुकीचा अर्ज क्रमांक व चुकीची जन्मतारीख नमूद केल्यास आपणांस प्रवेशपत्र डाऊनलोड करता येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी

२.१६ अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस कागदपत्रांच्या छाननीशिवाय लेखी परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवार लेखी परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी संबधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

२.१७ भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्यानुषंगाने होणाऱ्या बदलाबाबतची सर्व माहिती www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२.१८ विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्वीकृत केला जाणार नाही.

२.१९ ऑनलाईन प्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार असल्यास भ्रमणध्वनी क्र. ७३८७०८६४९९ वर अथवा ०२०-६७३३१११८ या दूरध्वनी क्रमांकावर सकाळी १०.०० ते ५.४५ या वेळेत संपर्क साधावा. अर्ज भरण्यासंबंधी, प्रवेशपत्र उपलब्धतेसाठी उमेदवारांनी support@pcmc.applyjobz.com या ई-मेल आयडीवर ई-मेल पाठवल्यानंतर उमेदवारांना त्यांच्या अडचणीचे निराकरण करुन तसा SMS/संदेश उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर किंवा मेल आयडीवर ई-मेल पाठवण्यात येईल. त्यासाठी उमेदवाराने अर्जामध्ये त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल इत्यादि माहिती अचूकपणे भरणे अनिवार्य आहे.

**३.लेखी परीक्षा :-**

३.१ लेखी परीक्षा ही त्या पदाची शैक्षणिक अर्हता, कामाचे स्वरुप, भाषा, सामान्यज्ञान, बुध्दिमत्ता चाचणी यांचेशी संबंधित राहील. उपरोक्त गट 'अ' ते गट 'ड' मधील सर्व पदाकरीता २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे.

३.२ लेखी परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ तसेच बैठक व्यवस्था याची माहिती महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

३.३ जाहिरातीत नमूद पदांकरिता अर्ज केलेल्या लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र व सूचनापत्र www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर लेखी परीक्षेच्या आठ(८) दिवस अगोदर टाकण्यात येतील. (अपलोड करण्यात येतील) उमेदवारांनी लेखी परीक्षा प्रवेशपत्र व सुचनापत्र स्वत: संकेतस्थळावरुन काढुन घ्यावे.

३.४ ज्या उमेदवाराचे लेखी परीक्षा प्रवेशपत्र व सूचनापत्र संकेत स्थळावरुन उपलब्ध होणार नाहीत, त्यांनी लेखी परीक्षेच्या २ दिवस आधी सहाय्यक आयुक्त (प्रशासन) पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडे प्रवेशपत्र व सूचनापत्र मिळण्याबाबत अर्ज करावा. त्यांना प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथून लेखी परीक्षा प्रवेशपत्र व सूचनापत्र उपलब्ध करुन देण्यात येईल.

३.५ लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाची असेल. तसेच ओएमआर उत्तरपत्रिका स्वतंत्र देण्यात येईल. त्याचा नमुना संकेतस्थळावर देण्यात येईल. उत्तरपत्रिकांची तपासणी ओएमआर मशीनवर करणेत येणार आहे.

३.६ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणणे बंधनकारक आहे, त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वत:जवळ जपून ठेवावे.

३.७ नि:समर्थ(अपंग) असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्या वेळी लेखनिकाची व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करणेत येईल. त्याकरिता परीक्षेचे वेळी लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत उमेदवाराने लेखी परीक्षेच्या ७ दिवस अगोदर सहा. आयुक्त(प्रशासन), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांच्याकडे अपंगत्वाच्या प्रमाणपत्रासह सुस्पष्ट लेखी मागणी करणे आवश्यक आहे. अशी लेखनिकाची मागणी न केल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार चालणार नाही.

३.८ ज्या उमेदवारांना परीक्षेच्या दिवशी लेखनिकाची मदत पुरविण्यात आली आहे, अशा उमेदवारांना व सर्व अल्पदृष्टी उमेदवारांना पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल. तथापि अशा उमेदवाराने लेखी परीक्षेच्या वेळी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

**४.निवड पध्दत:-**

४.१ जाहिरातीमध्ये नमूद पदांकरिता उमेदवारांची निवड लेखी परिक्षेमध्ये मिळणाऱ्या एकूण गुणाच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यात येईल.

४.२ लेखी परीक्षा झाल्यानंतर त्यादिवशी उत्तरतालिका (Answer Key) महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. त्याबाबत उमेदवारांची हरकत असल्यास त्यांनी ३ दिवसांत recruitment@pcmcindia.gov.in या ईमेल वर पाठवाव्यात. उमेदवारांकडून समक्ष हरकती स्वीकारल्या जाणार नाहीत. तसेच ईमेल व्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

४.३ ओमएमआर उत्तरपत्रिका मशीनवर तपासल्या जाणार असून, उत्तरपत्रिका तपासणीनंतर लेखी परीक्षेस उपस्थित राहणाऱ्या सर्व उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी(परीक्षेचा निकाल) प्रसिध्द करणेत येईल.

४.४ समान गुण असणाऱ्या उमेदवारांचा गुणवत्ता क्रम, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रनिम/२००७ /प्र.क्र. ४६/७/१३ अ, दि. २७/०६/२००८ मधील मुद्दा क्र.६ मध्ये दिलेल्या निकषावर लावला जाईल.

४.५ गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणाच्या ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

४.६ लेखी परीक्षेच्या निकालानंतर संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीकरीता पाचारण करण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. तसेच ई-मेलवर अथवा मोबाईलवर मेसेजद्वारा कळविणेत येईल. कागदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, समांतर आरक्षणाबाबतचा दावा, बँक चलन इ. बाबतची सर्व मूळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी एक साक्षांकित प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करणेत येईल व त्याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

४.७ कागदपत्रे तपासणीनंतर तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर यादीबाबत उमेदवारांची हरकत असल्यास त्यांनी ३ दिवसांत त्यांच्या हरकती recruitment@pcmcindia.gov.in या ई-मेल वर पाठवाव्यात. मुदतीनंतरच्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. प्राप्त हरकतीवरील निर्णयाअंती अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**५. सामाजिक व समांतर आरक्षणाबाबत :-**

५.१ जातीच्या दाव्याच्या पुष्ठ्यर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतरमागास वर्ग व विशेष मागास वर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतूदींनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५.२ उमेदवाराने अर्जामध्ये जातीचा व जात प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

५.३ विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती(क), भटक्या जमाती(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणाऱ्या (या प्रवर्गातील महिला, खेळाडू, माजी सैनिक, अपंग, अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या व अपंग उमेदवारासह सर्व) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

५.४ उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे शासनाने जाहीर केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे दि. ३१/३/२०१६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल. सदर प्रमाणपत्र सादर न करु शकणारे उमेदवार समांतर तसेच मागासप्रवर्गातील आरक्षणाचा(सामाजिक आरक्षण) लाभ घेण्यास अपात्र होतील.

५.५ उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. उमेदवाराने कागदपत्रे पडताळणीच्या वेळी अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५.६ विवाहित स्त्रियांचे बाबतीत त्यांनी पूर्वाश्रमीच्या नावाने जातीचे व नॉन क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५.७ विवाहित स्त्रीयांना विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचीत केलेले राजपत्र संबंधित उमेदवारांनी कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

५.८ खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी त्या क्रिमीलेअर प्रवर्गातील महिला नसल्याचे अर्जात नमूद करणे आवश्यक आहे.

५.९ फक्त कायम स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या उमेदवारांनाच अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचे व वयोमर्यादितील सवलतींचे फायदे देय असतील. तात्पुरत्या स्वरुपातील अपंगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या उमेवारांना अपंग व्यक्तींसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत.

५.१० अपंग व्यक्तीसाठी आरक्षीत पदावर नियुक्तीकरिता संबंधित व्यक्तीने त्या पदासाठी असलेली विहीत अर्हता धारण करणे आवश्यक आहे. तसेच त्यापदावर काम करण्यास तो सक्षम असला पाहिजे. सदर अपंग उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा कसे याची तपासणी नियुक्तीपूर्वी वैद्यकीय मंडळाकडून करुन घेण्यात येईल.

५.११ नि:समर्थ व्यक्ती(अपंग) व्यक्तीसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी मा.जिल्हा शल्य चिकित्सकांकडील नि:समर्थ व्यक्ती(अपंग)चे प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच नि:समर्थ व्यक्ती(अपंग) प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे.

५.१२ शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग न्याय-२००७/स.न्या/प्रक्र १०३ (भाग ३) / १६-अ दिनांक १९/१०/२००७ अन्वये विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार अपंगांसाठी आरक्षीत असलेल्या पदावर सरळसेवेने भरती करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार प्रथम त्याची भरती करण्यात येईल व भरती केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल. त्या सामाजिक प्रवर्गात उमेदवारांस सामावून घेण्यात येईल. त्यामुळे जाहिरातीत दर्शविण्यात आलेल्या आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

५.१३ गट 'क ' व 'ड' करिता खेळाडूंकरिता अर्हता- सदर पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तीक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धात प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू अथवा भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धातील प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू अथवा भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शालेय क्रीडा स्पर्धामधील प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू अथवा अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत वैयक्तीक अथवा सांघिक क्रीडा प्रकारामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू, खेळाडू आरक्षणासाठी पात्र असेल. राज्य अजिंक्यस्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच ज्या खेळाची नोंदणीकृत राज्य संघटना त्यांच्या अधिकृत राष्ट्रीय संघटनेशी संलग्न असेल, तसेच सदर राष्ट्रीय संघटनेला इंडियन ऑलिम्पिक असोशिएशनने संलग्नता दिलेली असल्यास, अशा राज्य संघटनेच्या स्पर्धेतील राज्यस्तरीय विजेत्यांनाही खेळाडू आरक्षणाचा लाभ देण्यात येईल.

५.१४ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.राक्रीधो/२००२/प्रक्र ६८/क्रीयुसे/२ दि. ३०/४/२००५ व शासन निर्णय क्र. क्रीअसो-१९०८(प्रक्र ३९४/०८)/य-२ दि. २१/८/२००८ नुसार विहीत केलेले क्रीडाप्रकार खेळाडू आरक्षणाकरिता ग्राहय धरणेत येतील.

५.१५ निवड यादी तसेच प्रतिक्षा यादीतील खेळाडू उमेदवारांची खेळाबाबतची प्रमाणपत्रे नियुक्तीपूर्वी मा.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठविणेत येतील. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे नियुक्तीबाबत पुढील कार्यवाही केली जाईल.

५.१६ माजी सैनिक, बडतर्फीने, गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारिरीक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळे सेवा संपुष्टात आलेले माजी सैनिक/ आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत.

**६. इतर सर्वसाधारण अटी/ शर्ती/सूचना :-**

६.१ पात्रता/आरक्षणासंदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे आवश्यक आहे. अर्जामध्ये प्रत्येक दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता/आरक्षणाचा दावा ग्राह्य समजला जाणार नाही.

६.२ नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र आवश्यक असणाऱ्या प्रवर्गातील उमेदवार यांनी ते उन्नत व प्रगत गटाबाहेरील आहेत असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. असे नमूद केलेल्या उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या दिनांकापर्यंत निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. अर्जामध्ये उन्नत व प्रगत गटाबाहेरील नाही असे नमूद केले असल्यास, नंतर सादर करण्यात आलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र निवडीसाठी ग्राह्य धरले जाणार नाही.

६.३ उमेदवाराने अर्जामध्ये स्पष्टपणे 'होय/(yes)' असे नमूद केले असल्यास कागदपत्र पडताळणीच्या दिनांकापर्यंत निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, अपंगत्वाचे प्रमाणपत्र, अंशकालीन असल्याबाबत दाखला व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडील अंशकालीन अनुभवाच्या नोंदणीबाबतचे प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त दाखला, भूकंपग्रस्त दाखला निवडीसाठी ग्राह्य धरण्यात येईल. अर्जामध्ये संबंधित बाबींचा/आरक्षणाचा स्पष्टपणे उल्लेख/दावा केलेला नसल्यास, तद्नंतर अथवा पडताळणीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रांचा/प्रमाणपत्रांचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही व त्याबाबतच्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

६.४ महाराष्ट्र मेडीकल कौन्सील किंवा महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलकडे नोंदणी करणे आवश्यक असणाऱ्या पदांसाठी कौन्सीलकडे नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र असणे किंवा कौन्सीलकडे नोंदणीसाठी अर्ज केलेला असणे आवश्यक आहे

६.४ उमेदवारांना लेखी परीक्षेची प्रवेशपत्रे, परीक्षेचे वेळापत्रक, बैठकव्यवस्था, कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व प्रतिक्षा सूची, अंतिम निवड व प्रतिक्षा सूची व इतर सर्व सूचना ह्या वेळोवेळी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

६.५ उपरोक्त पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी/वापराबाबतची शासनाने विहित केलेले प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल. शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि) विभाग, शा.नि.क्र. मातस २०१२/प्र.क्र.२०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.०४/०२/२०१३ अन्वये शासनाने विहित केलेले संगणक अभ्यासक्रम/माहिती तंत्रज्ञानविषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

६.६ निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन,वित्त विभाग शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/सेवा-४, दि.३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृती योजना ( Defined contribution Pension System) लागु राहील.

६.७ महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर.व्ही -२०००/प्रक्र१७/२०००/१२,दि. ०१/०७/२००५ अन्वये दि. २८/०३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही. तसे विहित नमुन्यात र.रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड केलेले प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

६.८ गट 'अ' व 'ब' मधील विशेष तज्ञ आणि वैद्यकीय अधिकारी या पदांवर अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीपूर्वी उमेदवाराची मा. जिल्हा शल्यचिकित्सक, पुणे यांच्याकडून तर इतर पदांकरीता मा.वैद्यकीय अधिक्षक, महापालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय यांच्याकडून वैद्यकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये शारीरीक व मानसिकदृष्ट्या तो पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती दिली जाईल.

६.९ उमेदवारांस मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

६.१० उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात

घेतले जाणार नाहीत.

६.११ नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांनी विहीत केलेली इतर बंधपत्र/प्रतिज्ञापत्र/वचनपत्र/करारपत्र इत्यादि विशिष्ट स्वरुपात भरुन दिल्याशिवाय महापालिका सेवेत रुजू करुन घेतले जाणार नाही.

६.१२ निवड प्रक्रिया सुरु झालेनंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व लेखी परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड/नियुक्ती कोणत्याही टप्प्यांवर रद्द करण्यात येईल.

६.१३ पात्र उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

६.१४ भरतीप्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८